जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2024
सकाळ

## शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त आज शिवाजी विद्यापीठात भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी बलिदान देणाऱ्या क्रांतिवीरांना अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या क्रांतिवन उद्यानात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र वाहून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी कुसुमाग्रजांच्या 'अनाम वीरा...' या कवितेचे वाचन करून हुतात्म्यांच्या स्मृती जागविल्या. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2024
पुण्यनगरी

# ध्येय निश्चित केल्यास करिअरच्या संधी : डॉ. गुरव

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना ध्येय निश्चित केल्यास करिअरच्या संधी प्राप्त होतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम. कॉम., एम.एस्सी., एम.बी.ए. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन माजी विद्यार्थी मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे होते.

डॉ. गुरव म्हणाले, पदवी व पदव्युत्तर शिक्षणानंतर सेवा, व्यापार, सल्ला, शिक्षण व स्पर्धा परीक्षा रोजगाराच्या अनेक संधी आहेत. आपण घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमावर निगडित कौशल्याधारित हजारो अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यासाठी शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित केले पाहिजे.

यावेळी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे प्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविक समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख सहायक प्रा. सुशांत माने यांनी करून दिली. सूत्रसंचालन सहायक डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी केले. आभार सहायक डॉ. नितीन रणदिवे यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2024
पुण्यनगरी

# 'अनुभवात्मक शिक्षण' कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई यांच्या सहकार्याने 'केस स्टडी व क्षेत्रभेट अभ्यासाद्वारे अनुभवाधारित शिक्षण' या विषयावरील दोनदिवसीय कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातील सेमिनार हॉलमध्ये याबाबतची कार्यशाळा पार पडली.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमीचे प्रतीक धमाल, गौरव पवार, स्वप्नील आंबुरे, विक्रम पाटील, भारतीय तंत्रज्ञान संस्थातील एम. एम. चिराग, रिज्युता काबंदी, आदिती वाकळकर, प्रथमेश मुरकुटे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट विभागातील सहायक प्राध्यापिका व कार्यशाळा समन्वयिका डॉ. कविता वड्राळे, डॉ. तानाजी घागरे आदी मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठातर्फे 'फोटो ऑफ दि विक'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक आणि प्रशासकीय सेवक यांच्यातील सृजनशीलतेला संधी देण्याच्या हेतूने विद्यापीठामार्फत 'फोटो ऑफ दि विक' ही स्पर्धा दर आठवड्याला ऑनलाईन स्वरूपात होणार आहे. त्यामध्ये विद्यापीठात प्रवेशित विद्यार्थ्यांनी आवर्जून सहभाग नोंदवावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात 'फोटो ऑफ दि विक' (आठवड्याचे छायाचित्र) या स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. मानसिंग टाकळे उपस्थित होते. अभिजित रेडेकर, आशिष घाटे यांनी स्पर्धेविषयी सादरीकरण केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी स्वागत केले.

10 AUG 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी सुविधा केंद्राच्या सुविधा 'ऑनलाईन'


## शिवाजी विद्यापीठाच्या संगणक केंद्राची कामगिरी; नवीन पोर्टलची निर्मिती

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : विद्यार्थ्यांना लागणाऱ्या विविध शैक्षणिक दस्तावेजांची उपलब्धता करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने नवीन ऑनलाईन पोर्टलची निर्मिती केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता केवळ तेवढ्यासाठी विद्यार्थी सुविधा केंद्राकडे प्रत्यक्ष भेट देण्याची आवश्यकता राहणार नसल्याची माहिती संगणक केंद्राचे प्रभारी संचालक अभिजित रेडेकर यांनी दिली.

विद्यापीठाचे संगणक केंद्र आणि परीक्षा विभागाकडील आयटी कक्ष यांनी संयुक्तपणे काम करून ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. या पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र, तात्पुरते पदवी प्रमाणपत्र, दुबार गुणतक्ता, उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र, रँक प्रमाणपत्र, गुणवत्ता प्रमाणपत्र आणि विशेष प्रमाणपत्र अशी सात प्रकारची कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची ऑनलाईन सुविधा विकसित केली आहे. आतापर्यंत या सेवांसाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रास प्रत्यक्ष भेट देऊन त्यासंबंधीचे अर्ज आणि पैसे भरावे लागत होते. या ऑनलाईन पोर्टलमुळे सात सेवांसाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता भासणार नाही.

या पोर्टलद्वारेच विद्यार्थ्यांना दस्ताऐवजांसाठीचा अर्ज आणि पैसे भरण्याची सुविधा दिली आहे. २००५ पासून पुढे उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचा पर्मनंट रजिस्ट्रेशन क्रमांक (पीआरएन)



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी सुविधा केंद्राच्या सुविधा आता ऑनलाईन उपलब्ध झाल्या आहेत.

आणि उत्तीर्ण झाल्याचे वर्ष इतक्या माहितीवर ऑनलाईन लॉगीन करता येऊ शकेल. २००५ पूर्वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मॅन्युअल फॉर्म भरावा लागणार असून, तोही येथे उपलब्ध आहे. ही प्रणाली तयार करण्यासाठी आशिष घाटे, शशिकांत हुक्केरी, विजय पाटील, सागर आंबेकर यांचे तांत्रिक साहाय्य लाभले आहे. या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांची मोठी सोय होणार असल्याने संगणक केंद्रातील सर्व सहकारी अभिनंदनास पात्र असल्याची प्रतिक्रिया कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी प्रणाली तयार करणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले.

**विद्यार्थ्यांच्या वेळ, पैशाची बचत होणार**

विद्यार्थ्यांना एकाच लॉगिनमधून सर्व दस्तावेजांकरिता अर्ज करण्याची, तसेच त्या सर्वांसाठी एकत्र ऑनलाइन पैसे भरण्याची सुविधा देण्यात आली आहे. या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या वेळ, पैशाची बचत होणार आहे. या प्रणालीमध्ये (Sukapps.unishivaji.ac.in/sfcapp/#/login) या लिंकद्वारे प्रविष्ट होता येते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 AUG 2024 लोकमत

# नष्ट होण्याच्या मार्गावरील 'कंदील पुष्प' पुन्हा प्रकाशमान व्हावे..

एखाद्या वनस्पतीची प्रजात नष्ट झाली तर ती परत निर्माण करता येत नाही. निसर्गाचा हा ठेवा जपून ठेवणे एवढेच आपल्या हातात आहे. ते आपण केले पाहिजे.

**'कंदील पुष्प' वनस्पतीची नवीन प्रजात युवा संशोधकांनी शोधून काढली आहे..**

- कोल्हापुरातील न्यू कॉलेजच्या वनस्पतिशास्त्र विभागाचे विद्यार्थी अक्षय जंगम, रतन मोरे आणि डॉ. नीलेश पवार गेली सहा वर्षे कोल्हापूर जिल्ह्यातील किल्ल्यांवरील वनस्पतींचा अभ्यास करीत आहेत, त्यांना ऑगस्ट २०२३ मध्ये विशाळगडावर 'कंदील पुष्प' वर्गातील ही वेगळी वनस्पती आढळली. 'सेरोपेजिया शिवरायीना' असे तिचे नामकरण करून छत्रपती शिवाजी महाराजांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली आहे.

**या वनस्पतीचे वैशिष्ट्य काय?**

- कंदील पुष्प ही सेरोपेजिया गटातील रुईच्या कुळातील वेलवर्गीय वनस्पती आहे. या प्रकारच्या अनेक वेली, छोट्या वनस्पती सह्याद्रीतल्या डोंगरदऱ्यांत फक्त पावसाळ्यात वाढतात. स्थानिक याला खरतुडी हमण, खरचुडी, खरपुडी या नावांनीही ओळखतात. या वनस्पती दुर्मीळ आहेत. कंदील पुष्प वनस्पतीच्या वेगवेगळ्या जातींना वेगवेगळ्या रंगांची सुंदर फुले येतात. यातल्या काही जाती सुगंधीही आहेत. या वनस्पतीला चीक असतो आणि त्यांचे परागीभवन छोट्या कीटकांमार्फत होते. पावसाळ्यानंतर या वनस्पती मरून जातात अन् त्यांचा कंद फक्त जमिनीत शिल्लक राहतो. या कंदापासून पुढच्या वर्षी पुन्हा वनस्पती वाढते. सह्याद्रीच्या सर्वच डोंगरउतारांवर ही वेलवर्गीय वनस्पती आढळते.

**या वनस्पतीला असे अनोखे नाव कसे पडले?**

- कंदील पुष्पची पाने परस्परविरोधी असतात. फुले हनुमानाच्या गदेसारखी असतात, त्यांना जमिनीत एक कंद असतो. त्यामुळे त्यांना 'हनुमान बटाटा' असेही म्हणतात. फुले कंदिलासारखी असल्याने त्यांना 'कंदील पुष्प' असेही म्हणतात. फुलाच्या तळाला फुगीर, लंबगोल, त्यावर अरुंद उंच नळीचे धुराडे असते. त्याच्यावर उष्ण हवा बाहेर जाण्यासाठी खिडक्या आणि हवेत वर नक्षीदार कळस किंवा घुमट अशी या फुलांची रचना असते. ही प्रजात एक फुटापर्यंत वाढते. फुलासह ही वनस्पती संपूर्ण हरितवर्णीय असते.

**प्रा. डॉ. एस. आर. यादव**



ज्येष्ठ वनस्पतिशास्त्रज्ञ

**या वनस्पतीचे वैशिष्ट्य काय?**

- जगात 'कंदील पुष्प'च्या २४४ प्रजाती आहेत, तर देशात ५३ प्रजाती आहेत. त्यातील सर्वाधिक कंदील पुष्पच्या २५ प्रजाती एकट्या महाराष्ट्रात सापडतात. त्यात आता या एकाची भर पडली आहे. याच्या १८ प्रजाती प्रदेशनिष्ठ आहेत. जगात सेरोपेजियाच्या सर्वाधिक प्रजाती आफ्रिकेत आहेत. मादागास्कर, भारत, चीन, कॅरेबियन प्रदेशात ही वनस्पती आढळते; परंतु जगात प्रदेशनिष्ठतेसाठी महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. २०० वर्षांपूर्वी भारतातच या वनस्पतीचा सर्वप्रथम शोध लागला. पोटदुखीवर औषधी असल्याने गुराखी किंवा स्थानिक लोक याचे कंद काढून खातात, तसेच जनावरेही ते खातात. कंदील पुष्प समूहाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यांचे जतन, संवर्धन करून त्या पुन्हा 'प्रकाशमान' करण्याची गरज आहे. यातल्या बहुतेक जाती दुर्मीळ होत आहेत, तर काहींचे अस्तित्व आता धोक्यात आले आहे.



शिवाजी विद्यापीठ आणि पुण्याच्या आगरकर संशोधन केंद्राने २००८ ते २०१२ या कालावधीत डीबीटी अर्थसाहाय्यातून 'कंदील पुष्प'च्या २० प्रजातींचे प्रयोगशाळेत ऊती संवर्धन करून त्यांचे नैसर्गिक अधिवासात जतन करण्याचा उपक्रम केला आहे.

शब्दांकन : संदीप आडनाईक, कोल्हापूर